स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 30—01—2018 रोजी दुपारी 03—00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिति सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 423ः— {जलप्रदाय विभाग} नागपूर शहर पेंच टप्पा —४, भाग — ४, पॅकेज क्र. ३A भाग —१ अंतर्गत वितरण जलवाहिन्या टाकण्याच्या कामाचे रू. ३,४०,७२,७४४/— या रक्कमेच्या सुधारीत प्राकलनास कार्योत्तर मंजुरी प्रदान करण्याचा, तसेच हे अतिरीक्त रु. ८१,३८,१९० रक्कमेचे काम मे. सेन्ट्रल इंडिया इंजिनियरींग, नागपूर यांनी केलेले असल्याने त्यांना अतिरीक्त केलेल्या कामाचे भुगतान मंजूर निविदा दरांने करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 424ः— {लोककर्म झोन 03} महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत मौजा— नरसाळा येथील Recreational Ground चे स्थापत्य विषयक बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण तीन निविदाकाराची निविदांपैकी मे. एम. डी. कन्ट्रक्शन यांची प्राक्कलनीय दरापेक्षा

११.०० टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. १,००,८९,९४८/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 425:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 7 (ब) मधील नवा नकाशा व बुध्द नगर येथे सिमेंट कॉक्रीट पेव्हमेंट तयार करण्याच्या रु. 45,07,152/— च्या प्रस्तावास निविदोत्तर प्रशासकीय मान्यता प्रदान करून याकामाकरिता प्राप्त पाच निविदापैकी मे. आर. बी. केवलरामाणी यांची 17.87% कमी दराची रु. 37,01,724/— ची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 426:— {कार्य.अभि. झोन 05} प्रभाग क्र. 28 अ अंतर्गत दिघोरी दहन घाटाचे सौंदर्यीकरणाची व पायवाटेची कामे तसेच शेडची कामे करण्याच्या कामास्तव रूपये 41,36,810/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 427:— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 33, अ मधील भगवान नगर परिसरात रोडचे सिमेंटीकरण करण्याचे कामास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रू. 49,11,545/–रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करून निविदा काढण्याचा व या आर्थिक वर्षात पद क्र. 680(A42001374612) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 428:— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 33 ब अंतर्गत बालाजी नगर (प) येथे मानेवाडा सिमेंट रोड ते श्रीधर मेश्राम यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 11 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. आर. बी. केवलरमानी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 15.83 टक्के कमी दराची निविदा रूपये 41,27,303/– (रूपये ऐक्येचाळीस लक्ष सत्तविस हजार तिनशे तिन रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक DPDC MP (651) A42001361203 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 429:— {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 33 क मधील भगवान नगर बॅक कॉलोनी येथील रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 10 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. आर. बी. केवलरमानी हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 17.75 टक्के कमी दराची निविदा रूपये 41,03,642/– (रूपये ऐक्येचाळीस लक्ष तिन हजार सहाशे ब्येचाळीस रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक (680) A42001374612 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 430:— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. 44 — अ (जुने), 27 अ (नविन) अंतर्गत दर्शन कॉलनी येथील श्री. केवटे ते दुबे यांच्या घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकाम करण्याचा रू. 27,32,408/— राशिचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निविदातील निम्नतम निविदाकार निविदांपैकी मे. अमोल पुसदकर यांची प्राकलनीय दरापेक्षा 4.00 टक्के कमी दराचे रू. 26,23,112/— राशीचे निविदेस स्थायी समिती ठराव क्र. 736 दि. 18.11.2016 अन्वये मंजुरी प्राप्त आहे. त्या नुसार कंत्राटदारास कार्यादेश सुध्दा निर्गमित करण्यात आले. परंतु कामास सुरवात करण्याचे दृष्टीने कामाचे ठिकाणी ट्रायल पीट घेतल्या असता प्राक्कलनीय अंर्तभुत मानकाप्रमाणे काम करण्यास तांत्रीक अडचन आल्यामुळे सदर्हु कामाचे सुधारीत रू. 54,50,020/— राशिचे प्राकलन तयार करण्यात आले असुन त्यानुसार

(54,50,020–27,32,408) रू. 27,17,612/– अतिरिक्त राशीची आवश्यकता आहे. तसेच सुधारित प्राक्कलनानुसार चे काम कंत्राटदार मे. अमोल पुसदकर हे 4.00 टक्के कमी दराने करण्यास तयार आहे. त्या अनुषंगाने रू. 27,17,612/– अतिरिक्त राशीची तरतुद मुक्त करून रू. 54,50,020/– राशिचे सुधारीत प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 431:– {लोककर्म झोन 06}

प्रभाग क्र. १९ ड बजेरिया येथील रमेशचंद्र पिपलवा मार्ग येथे सिमेंट कॉक्रींट रोडचे बांधकामास्तव मे. उल्हास एन्टरप्राईजेस यांची प्राकलनिय दरांपेक्षा १५.०० टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ३६,०२,४८५/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 432:– {नगररचना विभाग}

मौजा – चिंचभुवन व मौजा – हुडकेश्वर (बु.), नरसाळा येथे नगर रचना परियोजना तयार करण्याकरीता एकुण आठ (8) संस्थेची पात्रता सुची (Empanellment) करण्यास मा. आयुक्त महोदय यांनी दि. 07.12.2016 रोजी मंजुरी प्रदान केलेली असून या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करणेस्तव पात्रता सुचितील संस्थांकडून मोबदला शुल्क आकारण्याबाबत प्रस्ताव मागविण्यात आलेले होते. निवड सुचीमधील सर्व संस्थांकडून मोबदला शुल्क आकारणीबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले होते. प्राप्त प्रस्तावांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून नस्तीत संलग्न आहे.

तुर्तास मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता नगर रचना परियोजना (T.P.Scheme) तयार करण्याचे प्रस्तावित असून, तुलनात्मक तक्त्यानुसार Designe Point Consult Pvt. Ltd. 607-610, 'B' Wing Tirupati Plaza Athgate, Surat, Ahmadabad यांनी खालीलप्रमाणे निम्नतम मोबदला शुल्काचा प्रस्ताव दिलेला होता.

मौजा – हुडकेश्वर (बु.) क्षेत्र – 313.46 हे.आर. करीता रू. 5500/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,24,030/– आणि मौजा – नरसाळा क्षेत्र – 297.61 हे.आर. करीता रू. 5,900/– प्रति हे.आर. प्रमाणे एकुण रू. 17,55,899/– याप्रमाणे एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्क संबंधीत संस्थेने आकारलेले होते.

मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिध्द् करण्यात आलेली असून, उक्त नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन ठराव क्र. 08, दि. 24. 03.2017 अन्वये मौजा – चिंचभुवन हा स्मार्ट सिटीमध्ये समाविष्ठ करण्यात आला आहे का ? हि बाब प्रशासनाने तपासावी तसेच मौजा – हुडकेश्वर (बु.) नरसाळा यांच्या विकास आराखडयांत पुर्वी नियुक्त करण्यात आलेल्या निवीदा काराने नगर रचना परियोजना काही प्रमाणात समाविष्ठ केल्या आहे का ? या बाबतची तपासणी करून योग्य प्रस्ताव स्थायी समितीकडे परत सादर करावा असे आदेश देण्यात आलेले होते.

त्यानुसार खालीलप्रमाणे माहिती व प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

1) मौजा – चिंचभुवन हे क्षेत्र स्मार्ट सिटी अभियानमधे अद्याप समाविष्ठ करण्यात आलेले नाही.

2) मौजा – हुडकेश्वर (बु.) नरसाळा यांच्या विकास आराखडयांत पुर्वी नियुक्त करण्यात आलेल्या निवीदेमधे नगर रचना परियोजना समाविष्ठ करण्यात आलेली नाही.

तसेच मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड इंजिनिअरींग प्रा.लि. यांचे दि. 08.03.2017 चे अर्जात नमुद प्रमाणे मौजा–हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता रू. 5,260/– प्रति हे.आर. व या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे मोबदला शुल्काचा प्रस्ताव कळविलेला आहे. तथापि सदर प्रस्ताव हा विहीत मुदती नंतर विभागास प्राप्त झालेला आहे.

मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा या क्षेत्राकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 26 अंतर्गत प्रारूप विकास योजना प्रसिध्द् करण्यात आलेली असून, उक्त नकाशात दर्शविल्याप्रमाणे क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव एकुण रू. 34,79,929/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर याप्रमाणे Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न विचारात घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या प्रकरण (5) संविदा मधील 2 (2) प्रमाणे मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड इंजिनीअरिंग प्रा.लि. यांचे दर रू. 5,260/– हे निम्नतम असल्यामुळे व त्यामुळे म.न.पा.च्या खर्चात बचत होत असल्यामुळे यास स्थायी समितीने ठराव क्र. 63 दि. 09.06.2017 नुसार एकमताने मंजुरी प्रदान केली आहे.

तथापि मा. आयुक्त यांचे निर्देशानुसार विहीत मुदतीत किमान दराची निविदा प्राप्त झालेल्या संस्था व्यतिरीक्त इतरांसोबत वाटाघाटी करता येईल काय ? याबाब म.न.पा.चे कायदयाचे सल्लागार यांचे अभिमत मागविले असता, दि. 15.11.2017 रोजीचे कायदयाचे सल्लागार यांनी दि. 18.11.1998 रोजीचे CVC Guidelines चे अनुषंगाने केवळ सर्वाधिक कमी दराची निविदा प्राप्त झालेल्या संस्थेसोबत वाटाघाटी करण्याचे प्रावधान असल्याचे नमुद केलेले आहे. त्याअनुषंगाने M/s Design Point Consult Pvt. Ltd., यांना सदर प्रकरणी वाटाघाटी करण्याकरीता दि. 12.12.2017 ला बोलावीले असता M/s Design Point Consult Pvt. Ltd., यांचे पत्र क्र. DPC/TP/NP – 4 दि. 12.12.2017 नुसार मौजा – हुडकेश्वर (बु.) व नरसाळा येथील क्षेत्र 611.07 हे.आर. करीता नगर रचना परियोजना तयार करणेस्तव रू. 5,000/– प्रती हे.आर. किमान दराबाबत सहमती दर्शविलेली असुन याप्रमाणे एकुण रू. 30,55,350/– या व्यतिरीक्त देय असलेला सेवा कर Design Point Consult Pvt. Ltd. यांना मोबदला शुल्क देणेस्तव मा. स्थायी समितीची मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित प्रकरणातील संचिकेतील पान क्र. 30 वर आयुक्त, म.न.पा. यांनी स्थायी समिती ठराव क्र. 63 दि. 09.06.2017 कार्यान्वित केला आहे. संचिकेतील कायदेशीर सल्लागाराचे अभिमताचे अवलोकनाची स्पष्टता विभागास झाली नाही किंवा कसे याबाबत स्थायी समितीस संभ्रम आहे. आणखी असे की निविदा विधी ग्राहय कालावधी सुद्धा या प्रकरणात संपुष्टात आला आहे. त्यामुळे विभागाने सादर केलेला प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. तसेच या प्रकरणात फेर लघुनिविदा करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 433:— प्रभाग क्र. 36(क) ईद्रप्रस्थ लेआऊट येथे उद्यान विकास {उद्यान विभाग} करण्याकरीता रू. 27,97,382/— रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 268/दि. 29/11/2017 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने विविध कामांच्या कामनिहाय निविदा मागविल्या असता प्राप्त निविदे पैकी सर्वात कमी दराच्या निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | निविदाकाराचे नाव | टक्के कमी/जास्त दर | निविदा राशी |
|---|---|---|---|---|
| 1 | विविध स्थापत्य कामे | मे. बाबा एन्टरप्रायझेस | 12.15% कमी | रू. 843777/— |
| 2 | हिरवळीची कामे | मे. श्री. हिमालया प्लान्टेशन | 3.60% कमी | रू. 1516073/— |
| 3 | खेळणी बसविणे | मे. मल्टीपल सोलूशन | 11.00% कमी | रू. 165362/— |
| 4 | ग्रीन जिम बसविणे | मे. मल्टीपल सोलूशन | 7.90% कमी | रू. 272170/— |
| | | | एकूण रू : | रू. 27,97,382/— |

प्राप्त वरिल प्रमाणे एकत्रित राशी रू 27,97,382/—च्या निम्मतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 434:— प्रभाग क्र. 30 — अ अंतर्गत संतोषी माता नगर येथे सिमेंट {लोककर्म झोन 05} रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रूपये 38,99,029/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 435:— प्रभाग क्र. 33 ब मधील भगवान नगर व चंद्रर ले—आऊट {लोककर्म झोन 04} येथील रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 8 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. एन. एन. बेलखोडे हयांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.0060 टक्के कमी दराची निविदा रूपये 41,95,991/- स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्रमांक (680) A42001374612 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 436:— प्रभाग क्र. 25, येथील पूनापूर घाटा चे दुरूस्ती करण्याचे {लोककर्म झोन 08} कामास्तव रू. 46,80,979/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 437:— स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील सर्व नागरी {आरोग्य विभाग} स्थानिक स्वराज्य ***संस्थांमध्ये दि. 01/01/2018 ते 28/02/2018 या कालावधीत स्वच्छ वार्ड स्पर्धा आयोजित करण्याबाबत नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. स्वअम-2017/प्र.क्र.262/नवि-34, दि. 30/12/2017 प्राप्त झाला आहे. स्पर्धेचे निकष व गुण शासन निर्णयात नमूद केलेले असून सोबत जोडले आहेत. दिनांक 1/01/2018 पासून ते 28/02/2018 पावेतो हि स्पर्धा राबवावियाची आहे. तसेच या स्पर्धेची त्रयस्त संस्थेमार्फत तपासणी करून दिनांक 25/03/2018 पावेतो शासनास अहवाल सादर करावयाचा आहे. गुणानुक्रमानुसार पहिल्या तिन क्रमांकाच्या प्रभागांना शासनातर्फे अनुक्रमे रू. 50 लक्ष, रू 35 लक्ष व रू. 20 लक्ष रकमेचे पारितोषिक देण्यात येणार आहे. व या बक्षीस योजनेसाठी कोणत्यानिधी मधून खर्च करावा याबाबतचे आदेश शासनाद्वारे देण्यात येणार आहे.***

***नागपूर महानगरपालिकेत देखील हि स्पर्धा आयोजित करावयाची असून सर्व 38 प्रभागांचा यामध्ये सहभाग घेण्यात येणार आहे. स्पर्धेची तपासणी करून अहवाल शासनास सादर करण्याकरीता अखील भारतीय स्थानीक स्वराज्य संस्था मुंबई यांनी प्रस्ताव सादर केलेला असून संस्थेने या कामाकरीता तज्ञ व्यक्ती/संशोधन सहाय्यकांचे मानधन, तज्ञ व्यक्तींचा प्रवास/स्थानिक***

***प्रवास खर्च नागपूर मध्ये राहण्याचा व जेवणाचा खर्च, स्टेशनरी, अहवाल तयार करण्याचा खर्च, संपर्क खर्च तसेच 18 टक्के जीएसटी इ. करीता रूपये 6,50,000/- (अक्षरी रूपये सहा लक्ष पन्नास हजार फक्त) मानधनाची रक्कम प्रस्तावात नमूद केली आहे. संस्थेचा या कामी असणारा प्रदीर्घ अनुभव व राज्य शासनाशी असलेले साहचर्य लक्षात घेता अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांना हे कार्य देण्याचे प्रस्तावीत आहे. या करीता येणारा खर्च आरोग्य विभागाच्या व्यय पद क्रमांक A24001222003 (अस्वच्छता निमुर्लन दक्षता पथक प्रशासकीय व परिवर्तन व्यय) या अंतर्गत करण्यात येईल.***

***स्वच्छ वार्ड स्पर्धेचे हे कार्य अखील भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस थेट देण्याचे प्रस्तावीत असल्याने सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेकरीता सादर करण्यात येत आहे.***

***सदर विषय मंजूर करण्याचा*** प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त विषयात विभागाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेस थेट संविदा करण्यास प्रस्तावित केले आहे. त्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या प्रकरण 5 संविदा मधील 2(2) च्या तरतुदी प्रमाणे प्रस्तावित संविदा करण्यास आयुक्तास प्राधिकृत करण्यास ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते.

## उपरोक्त ***विषयाचे प्रारूपाचे जोडपत्र***

*स्वच्छ महाराष्ट्र अभियानातंर्गत राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दि. 01/01/2018 ते 28/02/2018 या कालावधीत स्वच्छ वार्ड स्पर्धा आयोजित करण्याबाबत नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. स्वअम-2017/प्र.क्र.262/नवि-34, दि. 30/12/2017 प्राप्त झाला आहे. स्पर्धेचे निकष व गुण शासन निर्णयात नमूद केलेले असून ते खालील प्रमाणे आहेत.*

| अ.क्र. | प्रश्न | गुण |
|---|---|---|
| 1 | घरोघरी जाऊन कचरा संकलन पद्धत अवलंविणा-या घरांचे प्रामण | 100 |
| | १०० घरामधून संकलन% | 100 |
| | ७५-९९% | 75 |
| | ५०-७४% | 50 |
| | ५०% पेक्षा कमी | 0 |
| | | |
| 2 | एकूण निर्माण कच-यापैकी किती टक्के कच-याचे ओला कचरा आणि सुका कचरा या स्वरूपात वर्गीकरण केलेले आहे? | 400 |
| | १०० % (एकूण कच-याच्या) | 400 |
| | ७५-९९% | 200 |
| | ५०-७४% | 100 |
| | ५०% पेक्षा कमी | 0 |
| | | |
| 3 | वार्ड मध्येच ओल्या कच-यावर विकेंद्रीत पद्धतीने प्रक्रिया केली जाते | 100 |
| | १०० % (एकूण ओल्या कच-यापैकी) | 100 |
| | ७५-९९% | 75 |
| | ५०-७४% | 50 |
| | ५०% पेक्षा कमी | 0 |
| | | |
| 4 | वार्डातील नेहमी कचरा दिसणा-या ठिकाणाचे सुशोभिकरण | 50 |
| | १०० % ठिकाणांचे रूपांतर | 50 |
| | ७५-९९% ठिकाणांचे रूपांतर | 35 |
| | ५०-७४% ठिकाणांचे रूपांतर | 25 |
| | ५०% हुन कमी | 0 |
| | | |
| 5 (अ) | वार्डातील सर्व घरांमध्ये 100% वैयक्तिक शौचालयाचे प्रमाण आहे. | 100 |
| | होय | 100 |
| | नाही | 0 |
| | किंवा | |
| | | |
| 5 (ब) | वैयक्तिक आणि सामुदायिक/सार्वजनीक शौचालयांचे प्रमाण 50:50 % आहे; तसेच वार्डातील सर्व | 100 |

| | | |
|---|---|---|
| | *सामुदायिक/सार्वजनीक शौचालयांमध्ये स्त्री-पुरूष स्वतंत्र विभाग, विकलांग व्यक्तींच्या गरजा भागविण्यास सुविधा, पाणी, पुरेसा प्रकाश व विज पुरवठा आहे.* | |
| | *होय* | *100* |
| | *नाही* | *0* |
| | ***Assessor Observation*** | |
| *6* | *वार्डातील निवासी क्षेत्र- झोपडपट्टी/जुने शहर/अनियोजित व नियोजित क्षेत्र हे सर्व स्वच्छ आहे का?* | *50* |
| | *होय (100% स्वच्छता)* | *50* |
| | *होय परंतू (100% स्वच्छता नाही)* | *25* |
| | *स्वच्छता नाही* | *0* |
| *7* | ***IEC** हे होर्डिंग, पोस्टर वार्डातील महत्वाच्या ठिकाणी लावलेली आहेत का?* | *50* |
| | *होय* | *50* |
| | *नाही* | *0* |
| | | |
| *8* | *आपल्या वार्डामधील सर्व नगरसेवकांनी 1 जानेवारी 2017 ते 28 फेब्रुवारी 2017 च्या दरम्यान स्वच्छ सर्वेक्षण 2018 विषयी जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत* | *100* |
| | *6 कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.* | *100* |
| | *किमान 3 कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.* | *50* |
| | *3 पेक्षा कमी कार्यक्रम घेण्यात आले* | *0* |
| | | |
| *9* | *आपल्या वार्डामधील सर्व नगरसेवकांनी 1 जानेवारी 2017 ते 28 फेब्रुवारी 2017 च्या दरम्यान स्वच्छते विषयी लोकसहभागाचे (किमान 100 माणसे) श्रमदानाचे 8 कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.* | *400* |
| | *8 कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.* | *400* |
| | *किमान 4 कार्यक्रम घेण्यात आलेले आहेत.* | *200* |
| | *4 पेक्षा कमी कार्यक्रम घेण्यात आले* | *0* |
| | | |
| *10* | *वार्डात 100% मालमत्ता कर संकलन करण्यात आलेले आहे.* | *50* |
| | *100% कर संकलन* | *50* |
| | *80-99% कर संकलन* | *35* |
| | *50-79 % कर संकलन* | *15* |
| | *50 % हून कर संकलन* | *0* |
| | | |
| *11* | *वार्डात प्लास्टीक बंदी करण्यात आली असून राबविण्यात येत आहे.* | *50* |
| | *होय* | *50* |
| | *नाही* | *0* |
| | | |
| *12* | *वार्डात प्लास्टीक बंदी करण्यात आली असून त्यासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.* | *50* |
| | *होय* | *50* |
| | *नाही* | *0* |
| | | |

ठराव क्रमांक 438:— {स्थावर विभाग} मौजा — सिताबर्डी, नगर भुमापन क्र. १६८५, नारंग टॉवर, पाम रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथील पहिल्या मजल्यावरील नागपूर महानगरपालिकेच्या मालकीची एकुण ६९७.३३५ चौ.मी. बांधकाम क्षेत्र असलेली जागा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांना त्यांचे विभागीय कार्यालयासाठी रू. ३,०६,५८१/— प्रती महिना भाडे आकारून आवश्यक अटी व शर्तीवर प्रथम ११ महिण्याचे कालावधीसाठी देण्याकरीता अगावू ताबा देण्यास तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी आवश्यकतेनुसार विनंती केल्यास पुढील प्रत्येक ११ महिण्याचे अधिकतम ५ वर्षापेक्षा जास्त असणार नाही अशा कालावधीकरीता मुदत वाढ देण्याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ७९ (C) नुसार महानगरपालिका सभागृहाची मान्यता प्राप्त करण्याचे आधिन राहून मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 439:— प्रभाग क्र. १९ ड येथील राम मंदीराच्या मागील {लोककर्म झोन 06} भागापासून ते कुंभारपुरा पर्यंत नाल्याचे संरक्षण भिंतीचे बांधकामास्तव मे. राजेश एस रंगारी यांची प्राकलनिय दरांपेक्षा १५.५१ टक्के प्रतिशत ने कमी दरांची रू. ७०,४१,९४०/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 440:— प्रभाग क्र. 26 — अ अंतर्गत गंगा विहार कॉलोनी येथील {लोककर्म झोन 05} मैदानाला कम्पाउंड भिंत बांधकाम करण्याच्या कामास्तव रूपये 49,55,060/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 441:— प्रभाग क्र १० ड पटेलनगर, प्रशांत कॉलनी, बोरगाव {लोककर्म झोन 10} पर्यंत नाल्यांचे भिंतीचे बांधकामास्तव रू. ९९,९६,८३९/— (नव्यान्नव लक्ष छयान्नव हजार आठशे एकोणचाळीस रूपये फक्त) रक्कमेच्या प्राकलणास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न, तसेच नविन पद क्र. A४३९०१३७०८१२ व जुना पद क्र. (६१८) अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 442:— {वाहतूक विभाग} नागपूर शहरातील वाहतुकीचे कोंडीबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी जनहित याचीका क्र. 5/2016 मध्ये वाहतुकीची कोंडी संपुष्टात आणण्याकरीताचे निर्देशाप्रमाणे विस्तृत पार्कींग व्यवस्थापन करिता विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावयाचा आहे. या विस्तृत पार्कींग प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ट आहेत. शहरातील मुख्यभाग, मुख्य भागालगत असलेले मुख्य तसेच लहान रस्ते या ठिकाणी सार्वजनिक पार्कींगची व्यवस्था करणे, नो पार्कींग व पार्कींगची जागा ठरविणे, रस्त्याच्या बाजुला पार्कींग स्थळ ठरविणे, रस्त्यावर व्यवस्थित रित्या पार्कींगची व्यवस्था करणे इ. बाबींचा समावेश आहे. त्याकरिता नागपूर शहराकरिता तयार करण्यात आलेल्या पार्कींग पॉलीसी च्या धर्तीवर विस्तृत पार्कींग व्यवस्थापनेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता वाटाघाटीनंतर रूपये रू. 70.00 लक्ष अधिक जी. एस. टी च्या रकमेवर मे. यु. एम. टी. सी. हैद्राबाद यांची निविदेची अट शिथील करून नेमणूक करणे तयेच पद क्र. 40200440601 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन उपरोक्त प्रस्तावात विभागाने निविदेची अट शिथिल करुन नेमणुक करण्याचे प्रस्तावित केले असल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या प्रकरण 5 संविदा मधील 2(2) च्या तरतुदी प्रमाणे प्रस्तावित संविदा करण्यास आयुक्तास प्राधिकृत करण्यास ही स्थायी समिति एकमताने मंजूरी प्रदान करते.

ठराव क्रमांक 443:— म.न.पा. चे नविन प्रशासकीय इमारत मध्ये फायर फायटिंग सिस्टम {विद्युत विभाग} लावण्याकरीता में. मास्टर फायर इंजिनिअर्स, पुणे यांना रु. १,५०,४६,२५१/- चे कार्यादेश दि. २६.१२.२०११ ला देण्यात आले होते. सध्या पर्यंत अंदाजे रु. १०८ लक्ष चे कामे झालेली आहेत. इमारतीचे काम अपूर्ण असल्यामुळे फायर फायटींगची कामे पूर्ण करता आले नाही. वर्ष २०११ मधे कार्यादेश देऊन सहा वर्षाचा काळ उलटून गेलेला असून दरात फार वाढ झालेली असल्यामुळे कंत्राटदाराने सदर कंत्राट शार्ट क्लोज करण्यास त्याचे पत्र दि. ११.०७.२०१७ अन्वये विनंती केली आहे.

तरी कंत्राटदाराचे विनंती नुसार कार्यादेश क्र. एल.डी./१३५, दि. २६.१२.२०११ रु. १,५०,४६,२५१/- अन्वये रु. १०८ लक्ष पर्यंत खर्च सिमीत ठेऊन काम शॉर्ट क्लोज करुन उर्वरीत कामा करीता फेर / नविन प्राकलन तयार करुन कामे पूर्ण करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 444:— प्रभाग क्र. 23 क हिवरी कोठा येथे 1) भुखंड क्र. 409 ते श्री
{लोककर्म झोन 08} शाहू व 2) श्री डांगे ते श्री रामटेके` यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. अमीत कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरा पेक्षा 12.14 टक्के कमी दराची रु. 28,78,070/— (अक्षरी अठ्ठावीस लक्ष अठयाहत्तर हजार सत्तर रुपये ) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 679 ( A242001470511 ) अंतर्गत प्रस्तावीत आहे.

ठराव क्रमांक 445:— नागपूर शहराची मंजुर सुधारीत विकास योजना ही
{नगर रचना विभाग} दुसऱ्यांदा सुधारीत (मुळ हद्द) करण्याची प्रक्रिया सुरू करण्याकरीता नगर विकास विभागाचे पत्र क्र. टिपीएस—2416/269/प्र.क्र. 149/ 2016 / नवि—9, दि. 08 नोव्हे. 2016 अन्वये मान्यता प्राप्त आहे. शासन मान्यतेनूसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 25 अंतर्गत सर्वेक्षण व विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करण्यास्तव खाजगी ऐजन्सी नियुक्ती करीता मागविण्यात आलेल्या निविदेपैकी मे. मोनार्च सर्व्हेअर व इंजिनिअरींग कन्सलटंट प्रा.लिमि. यांची प्रती हेक्टर दर रू. 8,029/— असलेली निम्नतम दराची निविदा विचारात घेण्यात आलेली आहे. यास्तव नागपूर शहराचे (मुळ हद्द) एकुण 22700 हेक्टर क्षेत्राकरीता सर्वेक्षण व विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याकरीता येणाऱ्या रू. 18,22,58,300/—(अक्षरी रूपये अठरा कोटी बावीस लक्ष अठ्ठावन हजार तीनशे फक्त) या अपेक्षित खर्चास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित खर्चास जी.एस.टी. वगळुन मान्यता प्रदान करण्यात येते यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 446:— प्रभाग क्र. 23 क जगजीवनराम नगर येथे श्री पटेल ते श्री
{लोककर्म झोन 08} लुनावत यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. अमीत कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरा पेक्षा 14.55 टक्के कमी दराची रु. 36,61,150/— (अक्षरी छत्तीस लक्ष एकसष्ट हजार एकशे पन्नास रुपये ) राशीची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

या कामाचा खर्च पद क्र. 679 ( A242001470511 ) अंतर्गत प्रस्तावीत आहे.

ठराव क्रमांक 447:— प्रभाग क्र. 26 — अ अंतर्गत श्रीकृष्ण नगर येथील खसरा क्र.
{लोककर्म झोन 05} 55/3 कैलास गृहनिर्माण संस्था येथील रस्त्याचे रूंदीकरण, डांबरीकरण व फुटपाथचे काम करण्याच्या कामास्तव रूपये 49,78,300/—च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 448:— प्रभाग क्र. २२ ड अंतर्गत येथे रामपेठ डॉ. राममनोहर
{लोककर्म झोन 06} लोहिया शाळेच्या मागे सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू.२९,३७,९१८/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 449:— प्रभाग क्र. 27 अंतर्गत गुरुदेव नगर तुकडोजी सभागृहाच्या
{लोककर्म झोन 05} मागे नाल्यावर बॉक्स सेल टाईप नाल्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव रु. 31,34,490/— च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 450:— संभाजीनगर उद्यान व शास्त्री लेआऊट उद्यान येथे उद्यान
{उद्यान विभाग} विकसित करण्याकरिता राशी रू. 1,49,22,904/— रकमेच्या कामास केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान नागपूर शहराच्या हरित क्षेत्र विकास प्रकल्प अंतर्गत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक :— अमृत — 2016 / प्र.क्र. 187 / नवि — 33 दिनांक 24/08/2017 नूसार प्रशासकिय मंजूरी प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निम्मतम निविदाकार मे. रेनबो ग्रीनर्स यांची 11.25% कमी दराची राशी रू. 1,32,44,077/—च्या निम्मतम निविदेला मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 451:— ***नागपूर महानगरपालिकेतील इयत्ता नर्सरी ते 12 वी***
{शिक्षण विभाग} ***पर्यतच्या विद्यार्थ्यांना DBT प्रणालीचा वापर करुन (DBT Prepaid विद्याधन कार्डद्वारा) स्वेटर पुरवठा करण्यास्तव काढावयाच्या ई-निविदेस व लागणा-या निधीस स्थायी समिती ठराव क्र. 315, दि. 21/12/2017 अन्वये (रु. 66,14,800/- विद्यार्थी संख्येप्रमाणे व त्यांचेद्वारा खरेदी करण्यात आल्यानंतर कमी/जास्त होवू शकेल) अन्वये मंजुर करण्यात आलेला आहे. काढण्यात आलेल्या ई-निविदेत***

| Sl.No | Bidder Name | Amount | Bid Rank |
|---|---|---|---|
| 1 | Manohar Sakode & Brothers | 283.40 | L1 |
| 2 | Swadeshi Woollen Mills | 295.05 | L2 |
| 3 | DAMODARLAL TOSHNIWAL | 308.00 | L3 |
| 4 | M/s Baheti Brothers | 315.00 | L4 |
| 5 | RK TRADERS | 340.00 | L5 |
| 6 | Poddar Sales Corporation | 350.00 | L6 |
| 7 | vintex yantramag industrial co.op. society ltd | 350.00 | L6 |
| 8 | Garment House | 360.00 | L7 |
| 9 | Gayatri Garments | 376.00 | L8 |

***मे. मनोहर साकोडे अण्ड ब्रदर्स, नागपूर यांचे प्रति नग दर रु. 283.40/- निम्नतम असून दरपत्रक उघडल्यानंतर दि.11.01.2018 ला पुरवठा क्षमता व कार्यवितरणाबाबत झालेल्या बैठकीत दरपत्रकात निम्नतम ते उच्चतम मधील 9 पैकी प्रथम 3 निविदाकार निविदेत नमूद केल्याप्रमाणे निम्नतम दरावरा कार्य करुन विहीत कालावधीत संपूर्ण पुरवठा करण्यास तयार असल्यामुळे निम्नतम दरावर प्रति नग दर रु. 283.40/- खालील प्रमाणे***

***१. मे. मनोहर सकोडे अँण्ड ब्रदर्स***

***२. मे. स्वदेशी वुलन मिल्स***

***३. मे. दामोदर तोष्णीवाल***

***यांचे DBT प्रणालीप्रमाणे विद्यार्थीनिहाय स्वेटर पुरवठा करण्यास्तव पुरवठादारांचे पँनल नेमण्याचा व उपरोक्त पैकी कोणतेही पुरावठादार कार्य करण्यास असमर्थ ठरल्यास तक्त्यात नमूद पुढील क्रमाणे निविदाकारांना कार्य देण्याचा*** प्रश्न समितीने विचारात घेऊन ई–निविदेत भाग घेणाऱ्या 9 निविदाकारात प्रस्तावित काम समप्रमाणात विभागुन देण्यात यावे. हे काम निम्नतम दर रु. 283.40/– प्रमाणे असेल. उपरोक्त पुरवठा विभागाने स्पष्ट केलेल्या विहीत कालावधीत संपूर्ण पुरवठा निविदाकारास करणे बंधनकारक राहील. आणखी असे की पुरवठादार कार्य करण्यास असमर्थ ठरल्यास विभागाने पुरवठादाराच्या विरुद्ध नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 452:– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 3 (ड) अंतर्गत टिपु सुलतान चौक ते यशोधरा नगर चौक पर्यंत रस्त्यालगत ड्रेन लाईन टाकण्याच्या व फुटपाथ चे बांधकाम करण्याकरिता प्राप्त तीन निविदापैकी मे. हितेश कंस्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रू. 49,99,653/– पेक्षा 11.00 टक्के कमी दराची रू. 4449691/– ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र.614 (A42401370826) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 453:– {आरोग्य विभाग} स्वच्छ भारत मशिन अंतर्गत शासनाने मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षते खालील उच्चधिकार समितीने दिनांक 22/03/2016 च्या बैठकीत रु. 308 कोटी अपेक्षित DPR ला मान्यता प्रदान केली आहे. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत केंद्र शासनाचे विहित धोरणानुसार प्रती व्यक्ती रुपये 1200 प्रमाणे वर्ष 2011 ची लोकसंख्या 24,05,655 साठी अनुज्ञेय राशी रु. 288.68 कोटी एवढयावर सिमित केला आहे.

दरम्यानचा काळात स्वच्छ सर्वेक्षण करिता वाढलेले कामाचे स्वरुप व त्यासाठी मनपाला आवश्यक साहित्यची गरज लक्षात घेता हा DPR मूळ किमंत 308 कोटीच्या मर्यादेत सुधारित करण्यात आला. हया सुधारित DPR ला स्थायी समिती ठराव क्र. 177 दिनांक 10/10/2017 रोजी मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

DPR ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने DPR च्या Scope पैकी Item No. 3B waste to energy प्रकल्पा करिता निश्चित करण्यात आलेली रक्कम 241.12 कोटी वगळता उर्वरित Scope मधील घटकांची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने सुधारित DPR नुसार खालील साहित्य खरेदी करण्याकरिता दि. 22/11/2017 रोजी निविदा मागविण्यात आल्या.

| Item No. | Description | Unit | Qty |
|---|---|---|---|
| 1 | Litter Bins (Rectangular Twin Bins floor mounted with stand)(supply only)<br>(Colour – Green and Blue in equal qty.) | | |
| A | OPTION-1 HDPE | | |
| | Capacity 200 Ltrs. | Nos. | 1200 |
| | Capacity 120 Ltrs. | Nos. | 600 |
| B | OPTION-2 HDPE Bins with Minimum 1 mm (18 gauge) internal galvanized lining | | |
| | Capacity 200 Ltrs. | Nos. | 1200 |
| | Capacity 120 Ltrs. | Nos. | 600 |
| C | OPTION-3 Mild Steel (MS) | | |
| | Capacity 200 Ltrs. | Nos. | 1200 |
| | Capacity 120 Ltrs. | Nos. | 600 |
| D | OPTION-4 LLDPE | | |
| | Capacity 200 Ltrs. | Nos. | 1200 |

| Item No. | Description | Unit | Qty |
|---|---|---|---|
| | Capacity 120 Ltrs. | Nos. | 600 |
| 2 | Garbage Bins (240 Ltrs.) (Rectangular Bins floor mounted with Wheels) (Colour – Green and Blue in equal quantity)(Supply only) | | |
| A | OPTION-1 HDPE | Nos. | 250 |
| B | OPTION-2 LLDPE | Nos. | 250 |
| 3 | Secondary Storage Containers (4.5 Cum) (Reinforced steel frame and cladded with sheets along with hook arrangement) (Colour – 55 nos. Green, 175 Nos. Blue and 10 Nos. White) (supply only) | Nos. | 240 |
| 4 | Wheelbarrow for Collection of Street Sweeping Waste | | |
| A | LLDPE (Option-1) | | |
| i | Containerized wheel barrow of Capacity 200 Ltrs. | Nos. | 250 |
| ii | Containerized wheel barrow of Capacity 250 Ltrs. | Nos. | 250 |
| B | Mild Steel (Option-2) | | |
| i | Containerized wheel barrow of Capacity 200 Ltrs. | Nos. | 250 |
| ii | Containerized wheel barrow of Capacity 250 Ltrs. | Nos. | 250 |
| 5 | Hand Carts for Collection of Street Sweeping Waste (Capacity 10 cubic feet i.e. around 280 Ltrs. Minimum) ( MS) | Nos. | 250 |
| 6 | Rates for fixing of Twin Litter Bins including the material required for fixing for all capacity i.e. item no 1(A,B,C & D) | Nos. | 01 |

दिनांक 19/12/2017 रोजी उक्त निविदेतील Technical Bid उघडण्यात आले त्यामध्ये

A) Item क्र. 1, 2 साठी दोनच निविदाकार पात्र झाले.

B) Item क्र. 3, 5 साठी एकही निविदाकार पात्र ठरला नाही.

C) Item क्र. 4, करिता एकच निविदाकार पात्र ठरत होते.

Item No 1 (D) आणि 2 (A) करिता 2 निविदाकार अनुक्रमे

1) में. निलकमल प्लॉस्टीक लि., मुंबई व 2) में. वैदय इंडस्ट्रीज, नागपूर यांच्या निविदा पात्र ठरल्या आहेत.

शासन निर्णय उद्योग उर्जा व कामगार विभाग क्र. भांखस/2014/प्रक्र. भाग III/ उद्योग–4, दि. 01.12.2016 मधील मुद्दा क्र. 4.4.3.1 नुसार निविदेच्या तांत्रिक पडताळणीत दोन निविदा पात्र ठरल्यास फायनांशियल बिड उघडता येते. तथापी प्राप्त फायनांशियल बिड मधील निम्नतर दर जर प्राकलन किंमतीपेक्षा 20 टक्क्याने कमी व 10 टक्क्यापर्यंत जास्त असेल तरच साहीत्याची खरेदी करता येते अन्यथा फेर निविदा मागविण्याबाबत शासन निर्णयात नमुद आहे.

वरील तरतुदीला अनुसरून सदर निविदेचे फायनांशियल बिड उघडण्यात आले. त्यामध्ये त्यामध्ये Item No 1 (D) मधील 200 litter Twin Litter Bin व 120 litter Twin Litter Bin करीता में. वैदय इंडस्ट्रीज, नागपूर यांचे न्युनतम दर प्राप्त झाले असून ते अनुक्रमे 44 टक्के व 28 टक्के प्राकलन दरापेक्षा कमी आढळून आले तसेच Item No 2 (A) Garbage Bin with wheels 240 Litter करीता मे. निलकमल प्लास्टीक लि. मुंबई यांचे न्युनतम दर प्राप्त झाले असून ते प्राकलन दरापेक्षा 72.78 टक्के कमी आहे. दोन्ही निविदाकारांनी नमुद केलेले दर शासन निर्णयामध्ये दिलेल्या न्युनतम दर 20 टक्के पेक्षा कमी आढळून आले.

फेरनिविदा केल्यास निविदेमध्ये आता जे दर प्राप्त झाले आहेत त्यापेक्षा जास्त दर प्राप्त झाल्यास मनपाचे आर्थिक नुकसान होऊ शकते. तसेच कन्सल्टंटने निविदेमध्ये नमूद केलेल्या प्राकलन दराची शहानिशा करणे देखील आवयश्यक असल्याने कन्सल्टंटने DPR मध्ये दिलेल्या दराऐवजी समान क्षमतेच्या मात्र मिळत्या जुळत्या Specification च्या Govt. eprocurement market च्या दरांशी तुलना करण्यात आली. त्यामध्ये

1) Item No 1 (D) Twin Litter Bins with MS Stand Material - LLDPE (Capacity 200 Litre) करीता शासनाच्या GEM Portal वर 14,940/- Without Fitting प्रति बिन दर नमूद असून निविदाकाराने निविदेमध्ये रुपये 12,500 दर नमूद केलेला आहे हा दर GEM Portal वरील दरापेक्षा 16.33 टक्के कमी

आहे. (GEM Portal वर Fitting सहीत दर दिलेले नसून निविदाकाराने रुपये 14,000 प्रति बिन With Fitting दर नमूद केलेला आहे. यामध्ये रु. 1500 Fitting चे दर वेगळे नमूद करण्यात आलेले आहे.)

2) Item No 1 (D) Twin Litter Bins with MS Stand Material - LLDPE (Capacity 120 Littre) करीता शासनाच्या GEM Portal वर 10,513.8/- Without Fitting प्रति बिन दर नमूद असून निविदाकाराने निविदेमध्ये रुपये 7,500/- दर नमूद केलेला आहे हा दर GEM Portal वरील दरापेक्षा 28.67 टक्के कमी आहे. (GEM Portal वर Fitting सहीत दर दिलेले नसून निविदाकाराने रुपये 9,000/- प्रति बिन With Fitting दर नमूद केलेला आहे. यामध्ये रु. 1500 Fitting चे दर वेगळे नमूद करण्यात आलेले आहे.)

3) No 2A Garbage Bin With Wheel, Material - HDPE (Capacity 240 Littre) करीता शासनाच्या GEM Portal वर साहित्याच्या पुरवठयाचे दर प्रति बिन रु 6,500/- नमूद केले असून निविदाकाराने निविदेमध्ये रु. 2178/- प्रति बिन्स दर नमूद केलेला आहे. हा दर GEM Portal वरील दरापेक्षा 66.49 टक्क्याने कमी आहे.

वरील तिन्ही साहित्यासाठी निविदेमध्ये नमूद करण्यात आलेली प्रकालनीय राशीची एकूण रु. 3,95,00,000/- असून निविदाकारांनी निविदेमध्ये नमूद केलेल्या रक्कमेनुसार एकूण रक्कम रु. 2,27,44,500/- आहे. दोन्ही रक्कमेच्या फरकाची रक्कम 1,67,55,500/- असून एवढया रक्कमेचा मनपास आर्थिक फायदा होणार असून पुरवठा करण्यात येणा–या साहित्याची त्रयस्त संस्थेमार्फत तपासणी करण्यात येईल व निविदाकारांनी प्राकलन दरापेक्षा खुप कमी दर नमूद केल्यामुळे त्यांच्याकडून अतिरिक्त सुरक्षा ठेव देखील घेण्यात येईल.

निविदेतील Item No 4 (B) Wheelbarrow (for collection of street sweeping waste) करीता मनपाच्या कारखाना विभागाकडे या साहित्याचे प्रति नग रू. 6090 दर मंजूर आहेत. व ते सप्टेंबर 2018 पर्यंत वैध आहे. परंतू निविदेमध्ये या पेक्षा कमी दर प्राप्त होतील या उददेशाने निविदेमध्ये उक्त साहित्याचा समावेश करण्यात आला होता. निविदेमध्ये एकच निविदाकार (मे. निलकमल प्लास्टीक लिमीटेड मुंबई) पात्र ठरत होते. एकच निविदाकार असल्याने त्यांची निविदा ग्राहय धरण्यात आली नाही. या साहित्याच्या पुरवठया करीता कारखाना विभागाद्वारे मंजूर दरावर हे कार्य करण्याचे प्रस्तावित आहे. 250 Wheelbarrow खरेदी करावयाचे असून कारखाना विभागाद्वारे मंजूर असलेले दर प्रति Wheelbarrow रू. 6090 प्रमाणे या खरेदी करीता एकूण रू. 15,22,500/- खर्च अपेक्षित आहे.

निविदेतील Item No 5 Hand Cart (for Collection of street sweeping waste) करीता मनपाच्या कारखाना विभागाकडे या साहित्याचे प्रति नग रू. 12,427 दर मंजूर आहेत. व ते सप्टेंबर 2018 पर्यंत वैध आहे. परंतू निविदेमध्ये या पेक्षा कमी दर प्राप्त होतील या उददेशाने निविदेमध्ये उक्त साहित्याचा समावेश करण्यात आला होता. निविदेमध्ये एकही निविदाकार पात्र ठरत नसल्याने ही निविदा ग्राहय धरण्यात आली नाही. या साहित्याच्या पुरवठया करीता कारखाना विभागाद्वारे मंजूर दरावर हे कार्य करण्याचे प्रस्तावित आहे. 250 Hand Cart खरेदी करावयाचे असून कारखाना विभागाद्वारे मंजूर असलेले दर प्रति Hand Cart रू. 12,427/- प्रमाणे या खरेदी करीता एकूण रू. 31,06,750/- खर्च अपेक्षित आहे.

स्वच्छ सर्वेक्षणाच्या दृष्टीने विभागास या साहित्याची तातडीने खरेदी करणे गरजेचे असल्याने Item No 1(D) च्या साहित्य खरेदीचे कार्य में. वैदय इंडस्ट्रीज, नागपूर व Item No 2(A) च्या खरेदीचे कार्य में. निलकमल प्लॅास्टीक, मुंबई यांना देण्याचे प्रस्तावित आहे. या कामाकरिता एकुण रुपये 2,27,44,500/- एवढा खर्च अपेक्षित आहे तसेच Item No 4 व 5 या साहित्याची खरेदी कारखाना विभागाचे मंजूर दरावर करण्याचे प्रस्तावित आहे. हा खर्च शासनाच्या उच्चधिकार समितीने मंजूर केलेल्या रुपये 308 कोटीच्या DPR मधील Waste to Energy प्रकल्पाकरीता निश्चित करण्यात आलेली रक्कम वगळता उर्वरित रक्कमे अंतर्गत करण्याचे प्रस्तावीत आहे.

करिता निविदेतील Item No 1(D) व Item No 2 (A) मधील साहित्य खरेदीचे कार्य अनुक्रमे मे. वैदय इंडस्ट्रीज, नागपूर व मे. निलकमल प्लॅास्टीक, मुंबई यांना त्यांनी निविदेत नमुद केलेल्या दरावर देण्याचा तसेच Item No 4 व 5 ची खरेदी काराखाना विभागाच्या मंजूर दरावर खरेदी करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित निविदेतील Item No 1(D) व Item No. 2(A) मधील मे. वैदय इंडस्ट्रीज, नागपूर व मे. निलकमल प्लॅास्टिक, मुंबई यांना त्यांनी निविदेत नमूद केलेल्या निम्नतम दरावर देण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. तसेच Item No. 4 व 5 ची खरेदीबाबत लघुनिविदा काढण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 454 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |

**स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक ३०-०१-२०१८ रोजी दुपारी ०३-०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेत सामान्य प्रशासन विभागाकडून ठेवलेला प्रस्ताव.**

**नागपूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील पायाभूत सुविधा व नागरी सुविधा या दोन्ही सुविधा पुरविण्याकरिता श्री विजय आर. बनगिनवार, मुख्य अभियंता (प्रतिनियुक्तीने) लोककर्म विभाग हे नियत वयोमानानुसार दि. ३१/०१/२०१८ रोजी शासन सेवेतून सेवानिवृत्त होत असल्यामुळे, करार पध्दतीवर शासन निर्णय दि. १७ डिसेंबर, २०१६ च्या तरतुदीनुसार मासिक परिश्रमिक तत्वावर अंदाजे रु. ९,००,०००/- इतका वार्षिक खर्च अपेक्षीत आहे व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार, तांत्रिक सल्लागार (**Technical Consultant / Adviser**) म्हणून प्रथमतः १ वर्षाकरिता नियुक्त करण्यास स्थायी समिती यांनी तत्वतः मान्यता द्यावी ही विनंती. विभागाने ठेवलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ५३(३) मधील तरतुदीनुसार तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचे अधिकार आयुक्त, म.न.पा. यांना देण्यात येते अशी ही स्थायी समिती एकमताने मंजूरी प्रदान करते आणखी असे की, ही नियुक्ती ५३(३) मधील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादित व नियमाप्रमाणे असावी, तसेच या अनुषंगाने आयुक्तांनी निर्गमित केलेले आदेश स्थायी समिती कडून कायम करुन घ्यावे व या प्रस्तावास स्थायी समिती कडून कार्योत्तर मान्यता प्राप्त करुन घेणे विभागास बंधनकारक राहील.**